क्रमांक : अप्रवृ २००४/प्र.क्र.१२३/नवि २६
नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३० नोव्हेंबर, २००४

प्रति,

१) आयुक्त,
सर्व महानगरपालिका
२) मुख्याधिकारी,
सर्व नगरपालिका
३) आयुक्त,
महाराष्ट्र मुंबई क्षेत्रविकास प्राधिकरण, बांद्रा-पूर्व, मुंबई
४) व्यवस्थापकीय संचालक,
सिडको, नवी मुंबई
५) सभापती,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर
६) मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी, मुंबई.

मंत्रालयात महापालिका आयुक्तांची बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत अग्नि प्रतिबंधक उपाययोजना करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे ठरले.

१) महाराष्ट्र अग्नि प्रतिबंधक व सुरक्षितता विधेयकाचे प्रारुप अग्रक्रमाने तयार करणे.

२) बांधकामाची परवानगी देताना महापालिकेने इमारतीत प्रत्येक मजल्यावर अग्निरोधक यंत्रणा, आग विझविण्यासाठी २४ तास पुरेशा प्रमाणात पाणी साठविण्याची टाकी बांधली आहे याची खात्री करावी. आपत्कालीन अग्निशामक वाहने येऊ शकतील इतक्या रुंदीचे रस्ते ( Access & Approach road) असावेत. १५ मिटर पेक्षा उंच इमारती हायराईज स्ट्रक्चर समजावे.

३) भारतीय प्रमाणक संस्था ( ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड ) नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या राष्ट्रीय बांधकाम संहिता भाग-४ मधील सर्व तरतुदींची सर्व महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषदा व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना प्राधिकरण, १९६६ नियम ४०-अ (Maharashtra Region & Town Planning Act, १९६६) मधील तरतुदीनुसार शासनाने जाहिर केलेली विशेष प्राधिकरणे यांनी सर्व प्रकारच्या औद्योगिक, वाणिज्य, शैक्षणिक संस्थांच्या इमारती, त्याप्रमाणे निवासी हॉटेल्स व उपहारगृहे, सार्वजनिक ठिकाणी लोक एकत्र येण्याची ठिकाणे म्हणजेच मोठे सभागृह, चित्रपटगृहे, शॉपिंग मॉल, शासकीय निमशासकीय

इमारती, रुग्णालये व इतर संवेदनाशील इमारती व १५ मीटर पेक्षा उंच निवासी इमारत यांच्या बाबतीत सदर राष्ट्रीय बांधकाम संहिता भाग-४ मधील सर्व तरतुदींची काटेकोरप अंमलबजावणी करावी.

०२. सोबत राष्ट्रीय बांधकाम संहिता भाग-४ च्या प्रती सुलभ संदर्भासाठी जोडल्या असून नागरिकास व समाजाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीतून या संहितेतून तरतुदीची सर्व संबंधितांनी अंमलबजावणी करण आवश्यक आहे.

०३. या आदेशांचे पालन करताना काही त्रुटी, अडचणी असल्यास त्यासंबंधी आवश्यक त्या तांत्रिक सल्ल्यासाठी अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन, राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, विद्यानगरी सांताक्रुझ-पूर्व, मुंबई-४०० ०९८ (फॅक्स क्र. २६६७०८१९) यांचेशी संपर्क साधावा.

सहपत्र-१

( म.दि.आडिवरेकर )
शासनाचे उप सचिव

प्रत सहपत्रासह माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१) संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई-२५
२) अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र राज्य, सांताक्रुझ-पूर्व, मुंबई-९३

---